लोकमत

Date: 10 February 2010; Page:07; Edition: Nagpur

# आयपीएल सामन्यांचा स्टेडियमसारखा आनंद सिनेमागृहात

## यूएफओ मुव्हीजतर्फे आयोजन

नागपूर, दि. ९ (प्रतिनिधी) - देशातील क्रिकेटप्रेमींचा आयपीएल स्पर्धेचा आनंद द्विगुणित करण्यासाठी युएफओ मुव्हीजने पुढाकार घेतला आहे. आयपीएल सामन्यांचा स्टेडियमसारखा आनंद सिनेमागृहात बसून लुटण्याची संधी कंपनीतर्फे देशातील एक हजार सिनेमागृहांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यापैकी २५० मल्टीप्लेक्स असून त्यामध्ये नागपुरातील तीन मल्टीप्लेक्स व एका सिनेमागृहाचा समावेश आहे.

याबाबत आज कंपनीचे धोरणात्मक सल्लागार चारुहास साटम यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, या शो ला कंपनीने 'ट्वेंटी २० हंगामा' असे नाव दिले आहे. यामध्ये केवळ सिनेमागृहाच्या मोठ्या पडद्यावर सामने दाखविले जाणार नसून संबंधित सिनेमागृहास आयपीएल कार्निव्हलचे स्वरूप दिले जाणार आहे. त्यामध्ये चीअर लिडर्सचा डान्स मुख्य आकर्षण असेल. तसेच शिट्ट्या, विविध प्रकारचे टी-शर्ट्स, टोप्या सिनेमागृहात विक्रीसाठी उपलब्ध असतील. अशाप्रकारे पूर्ण वातावरण स्टेडियमसारखेच असेल.



ते म्हणाले, सिनेमागृहातील मोठ्या पडद्यावर दाखविले जाणारे सामने छोट्या पडद्यावरील सामन्यापेक्षा ३३ टक्के अधिक दिसतात. त्याशिवाय चित्राचा दर्जादेखील नक्कीच चांगला असतो. युएफओच्या या शोमध्ये दोन षटकांदरम्यान कुठलीही जाहिरात नसेल. अनेकदा खेळाडूंमधील वाद, विनोद, चर्चा दोन षटकांमध्येच होते. ती बघण्याची सुवर्ण संधी याद्वारे प्रेक्षकांना उपलब्ध होईल.

युएफओ मुव्हीज हा शो क्राऊन इन्फोर्टेटमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या सहकार्याने थेट उपग्रहाद्वारे लिंक करून दाखविणार आहे. सिनेमागृहांच्या एकूण महसुलातील ५० टक्के हिस्सा युएफओ स्वत:कडे ठेवेल. त्यामुळे सामना पाहण्याचे तिकीट दर सामान्यच असतील, असा दावा साटम यांनी केला.

नागपुरात हे सामने पाहण्याची संधी जसवंत तुली मॉल, आयनॉक्स पुनम मॉल, सिनेमॅक्स इटर्निटी मॉल व जयश्री सिनेमागृहामध्ये मिळेल. त्याशिवाय कंपनीने वणी, चांदूरबाजार, मोर्शी, हिंगणघाट आदी लहान गावांमधील सिनेमागृहांशीदेखील करार केला आहे.

युएफओ मुव्हीज ही व्हॅल्युएबल समूहाची मुंबईतील कंपनी आहे. कंपनीचे जगातील सर्वात मोठे उपग्रह जाळे आहे. कंपनीची देशभरातील २४ राज्यांमधील ८५० शहरात १,१७४ पडद्यांवर सेवा दिली जाते. कंपनीकडे डिजिटल सॅटेलाईट सिनेमा तंत्रज्ञानाचे पेटंट आहे. संजय गायकवाड हे कंपनीचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक आहेत.

पत्रपरिषदेस व्हॅल्युएबल समूहाच्या कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स कार्यकारी तपस्या नाईक व युएफओ मुव्हीजचे क्षेत्रीय व्यवस्थापक नवीन मंगरुळकर उपस्थित होते.